● *गेस्ट हाऊस*मध्ये प्रेम धवन लिखित गाण्यांना पडद्यावर अजीतसाठी मुकेश आणि रफीने आवाज दिले होते. ● *काली टोपी लाल रूमाल* या चित्रपटापासून चित्रगुप्त यांचे ॲरेंजर म्हणून दत्ता डावजेकर यांनी शेवटपर्यंत साथ दिली. ● बिमल रॉय यांच्या आग्रहाखातर एस. डी. बर्मन यांनी गायलेले गाणे *सुजाता*चे खास आकर्षण ठरले.

□ इसाक मुजावर

गेस्ट हाऊस (१९५९):

बरखा, *कंगन*बरोबरच १९५९ चा चित्रगुप्त यांचा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे *गेस्ट हाऊस*, *सी. आय. डी. गर्ल*चे दिग्दर्शक रवींद्र दवे या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. आणि *सी. आय. डी. गर्ल*प्रमाणेच त्यांचा हा चित्रपटदेखील त्यांच्या रहस्यमय चित्रपटांच्या परंपरेतला एक चित्रपट होता. लायन अजीत या चित्रपटाचा नायक होता. नायकाची भूमिका करीत असताना अजितने 'मुफ्त हुए बदनाम...' (*बारात*), 'मैं खुशनसीब हूं...' (*टॉवर हाऊस*) यासारखी काही गाणी मुकेशच्या आवाजात गायली. *गेस्ट हाऊस*मध्येदेखील तो मुकेशच्या आवाजात गायला होता. पण या चित्रटपटातील मुकेशचे गाणे इतके राज कपूरी वळणाचे आहे की ते ऐकताना त्या गाण्यावर अजितच्या चेहऱ्याची कल्पनाच आपण करू शकणार नाही. या चित्रपटातील 'जिसका जुता उसी का सर...' हे मुकेशचे गाणे आपण ऐकले तरीही गोष्ट आपल्याला जाणवेल. कारण रेडिओवर, कॅसेटवर वा ध्वनिमुद्रिकेवर हे गाणे ऐकताना आपण अजितला विसरून जातो. आणि राज कपूरचा चेहराच आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. इतके हे गाणे राज कपूरी ढंगाचे आहे. 'तुमसे, कुछ कहना है...' हे गाणे या चित्रपटात मुकेशने लताबाईंच्या बरोबर गायले होते. आणि ते अजित व नायिका शकीला यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. हे गाणेदेखील राज कपूरी ढंगाचेच एक गाणे आहे.



गेस्ट हाऊस - अजित आणि शकीला

मुकेशबरोबरच अजीत या चित्रपटात रफीच्या आवाजातदेखील गायला होता. 'झूठ का दीपक...' हे गाणे. या एका गाण्यापुरताच रफीचा आवाज चित्रगुप्तनी या चित्रपटात मर्यादित ठेवला होता. मुकेशबरोबर एक गाणे गात असताना लताबाईंनी या चित्रपटातील 'ठंडी ठंडी चले रे हवा...', 'तेरा जादू न चलेगा...' व 'दिल को लाख संभाला जी...' ही तीन गाणी एकटीने गायली होती. यापैकी 'ठंडी ठंडी चले रे हवा...' हे गाणे लताबाईंच्या आवाजातील 'हवा में उडता जाए...' (*बरसात*), 'धीरे से आ जा अखियन मे निंदिया...' (*अलबेला*) ही गाणी पडद्यावर गाणाऱ्या बिमला या अभिनेत्रीवर चित्रित करण्यात आली होती. 'दिल को लाख संभाला...' हे गाणे चित्रगुप्तनी ढोलकच्या ठेक्यावर रंगवले होते. आणि ते शकीलावर चित्रित करण्यात आले होते. गीता दत्तने गायलेले 'हमने सीखा प्यार में...' हे या चित्रपटातील गाणे एक नृत्यगीत होते. आणि सुमन कल्याणपूर व उषा मंगेशकर यांनी गायलेले 'निकला है गोरा गोरा चाँद...' हे गाणेदेखील एक नृत्यगीतच होते.

चित्रगुप्त यांच्या संगीतातील या चित्रपटातील एकजात सारी गाणी प्रेम धवननी लिहिली होती.

काली टोपी लाल रूमाल (१९५९):

बरखा, *कंगन*, *गेस्ट हाऊस*बरोबरच चित्रगुप्त यांच्या संगीतामुळे लोकप्रिय ठरलेला १९५९चा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे *काली टोपी लाल रूमाल*. चंद्रशेखर, शकीला, आगा, कुमकुम यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका होत्या. त्यापैकी एकाही कलावंताच्या नावाला तेव्हा मेलेबल व्हॅल्यू नव्हती. तरीही हा चित्रपट चालला आणि या चित्रपटाद्वाराच चित्रपट व्यवसायात उभे राहात असलेले निर्माते देवी शर्मा यांना या चित्रपटाने या व्यवसायात ठामपणे उभे केले.

हा चमत्कार या चित्रपटातील चित्रगुप्त यांच्या सुरील्या संगीताचा होता. आणि त्याचबरोबर कुमकुम या नृत्यतारकेच्या नृत्यातील अदाकारीचा *आरपार*मधील 'कभी आर कभी पार...' या गाण्यातील नृत्याने आपल्या चित्रपटात कुमकुमच्या नृत्याची क्रेझ निर्माण केली. १९५९च्या *उजाला*तील 'तेरा जलवा जिसने देखा...' व 'ओ मेरा नादान बालमा...' या दोन गाण्यांवर तिने केलेल्या नृत्याने तिच्या नृत्याची क्रेझ आणखीन वाढवली. हीच क्रेझ *काली टोपी लाल रूमाल* या चित्रपटातील लताबाईंनी गायलेल्या 'दगा दगा वई वई...' या गाण्यावरील तिच्या नृत्याने निर्माण केली होती आणि तिचे हे एक नृत्य पाहण्यासाठी प्रेक्षकांच्या या चित्रपटावर उड्या पडत होत्या. कुमकुमच्या नृत्याची क्रेझ निर्माण करणाऱ्या *आरपार*मधील 'कभी आर कभी पार...' हे गाणे लिहिणाऱ्या मजरूहनीच कुमकुमच्या नृत्याची क्रेझ निर्माण करणाऱ्या *काली टोपी लाल रूमाल*ची गाणी लिहिली होती. *उजाला*त माला सिन्हा नायिका असली तरी आपल्या नृत्यकौशल्यामुळे कुमकुम या चित्रपटात तिच्याहून अधिक भाव खाऊन गेली होती. आणि *काली टोपी लाल रूमाल*मध्ये देखील तिच्या नृत्यकौशल्याने हीच कमाल करून दाखविली होती. शकीला या चित्रपटाची नायिका असली तरी कुमकुमने आपल्या नृत्यकौशल्यामुळे या चित्रपटात तिच्याहून अधिक क्रेझ निर्माण केली होती.


१९५७च्या *नया दौर* या चित्रपटात कुमकुमने तिची बहीण राधिका हिच्याबरोबर 'रेशमी सलवार कुडता जाली का...' या गाण्यावर केलेले नृत्य हीट ठरले होते. तिच्या या नृत्याची लोकप्रियता कॅश करण्यासाठीच *काली टोपी लाल रूमाल* या चित्रपटात एक दुपट्टा गीत टाकण्यात आले होते. 'गोरी ओढ के मलमल निकले...'. लता व रफी यांनी गायलेले हे गाणे कुमकुम व हास्य अभिनेता आगा यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. आगाची प्रतिमा एक हास्य अभिनेत्याची. तरीही 'दिवाना आदमी को बनाती है रोटिया...' हे या चित्रपटातील गंभीर गीत त्याच्यावर चित्रित करण्यात आले होते. 'गोरी ओढ के मलमल...' या गाण्याबरोबरच या चित्रपटातील 'लागी छुटे ना...' हे आणखी एक गाणे लताबाईंनी

रफीबरोबर गायले होते. आणि ते चंद्रशेखर व शकीला यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. हे गाणे इतके लोकप्रिय ठरले होते की, कालांतराने या गाण्याचा मुखडा घेऊनच भोजपुरी भाषेत *लागी नाही छंटे रामा* या नावाचा एक चित्रपट निर्माण झाला. या भोजपुरी चित्रपटाला चित्रगुप्त यांनीच संगीत दिले होते. लताबाईंच्याबरोबर दोन गाणी गात असताना रफीने या चित्रपटातील 'ओ काली टोपी वाले जरा नाम तो बता...', 'यारों का यार लिए नखरे हजार...' ही दोन गाणी आशाबाईंच्या बरोबर गायली होती. व ती चंद्रशेखर व शकीला यांच्यावर चित्रित करण्यात आली होती. 'दगा दगा वई वई...'बरोबरच 'जा के हम अब तो हम...' हे या चित्रपटातील आणखी एक गाणे लताबाईंनी एकटीने गायले होते.

या चित्रपटातील एकजात सारी गाणी मजरूह सुलतान पुरींनी लिहिली होती. मराठीतील एक ज्येष्ठ संगीतकार *काली टोपी लाल रूमाल*पासूनच चित्रगुप्त यांचे ॲरेंजर बनले. आणि चित्रगुप्त यांच्या शेवटापर्यंत ॲरेंजर म्हणून त्यांनी त्यांना साथ दिली. हे संगीतकार म्हणजे दत्ता डावजेकर.

सुजाता(१९५९):

एस. डी. बर्मननी संगीतकार बनण्यापूर्वी १९४१च्या *ताजमहाल* या चित्रपटात माधुलाल डी. मास्टर यांच्या संगीतात एक गाणं गायलं होतं. 'प्रेम की प्यारी निशानी...' त्यानंतर ते संगीतकार बनले. १९४६च्या फिल्मीस्तानच्या *शिकारी* या चित्रपटात. *शिकारी*बरोबरच १९४६साली त्यांनी संगीतबद्ध केलेला आणखी एक चित्रपट पडद्यावर आला होता. *आठ दिन* या चित्रपटातदेखील त्यांचा आवाज ऐकू आला होता. पण किती गाण्यात?



सुजाता - सुनील दत्त आणि नूतन

अनेकांना आठवणार या चित्रपटातील एस.डी.बर्मन यांचे गाणे म्हणजे 'उम्मीद भरा पंछी...' पण त्यांनी हे एकच गाणे काही या चित्रपटात गायले नव्हते. या गाण्याबरोबर या चित्रपटातील 'बाबू बाबू रे दिल को बचाना...' या आणखी एका गाण्यात त्यांचा आवाज ऐकू आला होता त्या काळातील एक गायक अभिनेते एस.एस.पुरी यांच्याबरोबर. हे एस.एल.पुरी अमरीश पुरी यांच्या नात्यातील. अमरीश पुरी सायगलचेदेखील नातेवाईक आहेत हे तुम्हाला ऐकून माहीत असेलच. चमन पुरी व मदन पुरी हे अमरीश पुरी यांचे वडील बंधू सायगलचा हात धरून चित्रपटात आले. एस. एल. पुरीदेखील त्या काळात सायगलचा हात धरूनच चित्रपटात आले होते. आणि फिल्मीस्तान या त्या काळातील मातब्बर चित्रसंस्थेत अभिनेता व प्रॉडक्शन मॅनेजर म्हणून त्यांची वर्णी लागली होती. फिल्मीस्तानच्या चित्रपटात भूमिका करीत असताना काही चित्रपटात त्यांनी गाणीदेखील गायली. *आठ दिन*मध्ये एस.डी.बर्मन यांच्याबरोबर त्यांनी गाणे गायले होते.

*आठ दिन*मधील गाणे एस.डी.बर्मननी स्वतःच्या संगीतात गायलेले चित्रपटातील पहिले गाणे होते. आणि ते चांगले लोकप्रियदेखील ठरले होते. तरीही त्यानंतर १९५८पर्यंत आपलं गाणं त्यांनी आपल्या संगीतापासून आणि त्याचबरोबर चित्रपटापासून देखील एकदम दूर ठेवले होते. पण १९५८च्या बिमल रॉय यांच्या *सुजाता* या चित्रपटात मात्र बिमल रॉय यांच्या आग्रहावरून तब्बल बारा वर्षांनी गायला त्यांनी आपलं तोंड उघडलं. आणि या चित्रपटातील 'सुन मेरे बंधु रे...' हे गाणे गायले. त्यांनी गायलेले हे गाणे या चित्रपटाचे एक खास आकर्षण ठरले होते.

१९४९च्या *अंदाज*मध्ये नौशाद यांच्या संगीतात लताबाईंनी गायिलेले 'उठाये जा उनके सितम...' नव्हे, 'दा दिर दारा...' हे गाणे आपल्या चित्रपटातील वाढदिवसाचं पहिलं गाणं. त्यानंतर आपल्या चित्रपटात आलेले वाढदिवसाचं दुसरं गाणं म्हणजे *सुजाता*मधील 'तुम जियो हजारो साल...', *अंदाज*चे वाढदिवसाचे गाणे लिहिणाऱ्या मजरूह सुलतानपुरींनीच हे गाणे लिहिले होते. आणि ते *अंदाज*च्या वाढदिवसाच्या गाण्याइतकेच लोकप्रिय ठरले होते. पण हे गाणे नेमके कोणी गायले होते?

हे गाणं एस.डी.बर्मननी गीत दत्त व आशा भोसले या दोघींच्या आवाजात रेकॉर्ड केलं होतं. दोघींनी गायलेल्या गाण्यांपैकी गीता दत्तच्या गाण्यावर पसंतीचा शिक्कामोर्तब करून ते गाणं चित्रपटात समाविष्ट करण्यात आलं. पण रेकॉर्डसाठी ते गाणं देताना कसं कोण जाणे गीता दत्तच्या ऐवजी या गाण्याची गायिका म्हणून आशा भोसले यांचं नाव ग्रामोफोन कंपनीला सांगितलं गेलं. आणि ध्वनीमुद्रिकेवर या गाण्याची गायिका म्हणून त्यांचं नाव आलं. हे नावच या गाण्याची गायिका म्हणून वर्षानुवर्षं रेडिओवर सांगितले गेले. यामुळे आशा भोसलेंनीच हे गाणे गायले आहे असा अनेकांचा गैरसमज झाला. हा गैरसमज दूर करण्यासाठी रेडिओवर व ध्वनिमुद्रिकेवर ऐकू येणारं *सुजाता*तील वाढदिवसाचं गाणं मी नव्हे तर गीता दत्तने गायलेय, असा खुलासा आशाबाईंना शेवटी करावा लागला.

वाढदिवसाच्या गाण्याबरोबरच या चित्रपटातील 'हवा धीरे आना...' हे अंगाई गीतदेखील गीता दत्तने गायले आहे. हे अंगाई गीत सुलोचनाबाईंवर चित्रित करण्यात आलेय. दोन गाणी स्वतंत्रपणे गाताना गीता दत्तने या चित्रपटातील 'बचपन के दिन भी...' हे गाणे आशाबाईंच्या बरोबर गायलेय. नूतन व शशीकला या दोघींच्यावर हे गाणे पडद्यावर आहे. 'काली घटा छाए...' हे या चित्रपटातील गाणे आशा भोसलेंनी गायलेय आणि नूतनवर चित्रित करण्यात आलेय.

१९४९च्या *पतंगा* या चित्रपटातील चितळकर व शमशाद यांनी गायलेले, 'मेरे पिया गये रंगून...' हे गाणे आपल्या चित्रपटातील टेलिफोनवरचे पहिले गाणे. त्यानंतरच दुसरे गाणे म्हणजे १९५२च्या *अनहोनी* या चित्रपटात रोशन यांच्या संगीतात तलत व लता यांनी गायलेले 'मेरे दिल की धडकन...'च्या *सुजाता* या चित्रपटात ऐकू आले. या गाण्याचे बोल होते 'जलते है जिसके लिए...' तलतने हे गाणे गायले होते. आणि सुनील दत्त व नूतन यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. रफीनेदेखील या चित्रपटातील एक गाणे गायले होते. 'अंधे ने भी सपना देखा...' पण ते तलतच्या 'जलते है जिसके लिए...' या गाण्याच्या लोकप्रियतेखाली दबून गेले होते. यामुळे आज कोणाला आठवत नाही.●